**सेशन केस नं. ३३/१५**
**सा.क्र.२ निशाण क्र.४३**

**सरकार तर्फे साक्षीदार क्र. २ ची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,
माझे नांव :— विठ्ठल वडिलांचे नांव :— वसंत धुरी,
वय सुमारे :— ३८ वर्षे व्यवसाय :— पोलीस नाईक,
ब.क्र.५६१, वेंगुर्ला पो.ठा.
रहाणार :— वेंगुर्ले, तालुका :— वेंगुर्ला , जिल्हा:—सिंधुदुर्ग

........................

**अभियोग पक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्री. तोडकरी सरतपासणी**

दि.२८/११/२०१४ रोजी मी मालवण पोलीस स्टेशन येथे पोलीस कॉन्स्टेबल म्हणून कार्यरत होतो. घटनेपुर्वी ५ वर्षे मी मालवण पोलीस स्टेशन येथे कार्यरत होतो. दि.२८/११/२०१४ रोजी मी भरडनाका येथे वाहतुक नियंत्रक, नाका बंदी व पेट्रोलिंग डयुटीवर होतो. सदरची डयुटी ही २७/११/२०१४ रोजी रोलकॉलवर ठरविली होती. रोलकॉलच्या वेळी मी पोलीस स्टेशनमध्ये हजर होतो. डयुटी नेमणूकी बाबतची नोंद डयुटी बटवडा रजिस्टरमध्ये केली जाते. पोलीस कॉन्स्टेबल फर्नांडीस हे देखील माझेसोबत नाकाबंदी डयुटीवर होते.

२. दि.२८/११/२०१४ रोजी मी प्रथम पोलीस स्टेशनला गेलो, त्यानंतर ड्रेसवर मी भरडनाका येथे सकाळी ०९.०५ वाजता डयुटीवर रवाना झालो व तशी नोंद स्टेशन डायरीला घेणेत आली. माझे अंगावर त्यावेळी ट्राफिक पोलीसचा पांढरा शर्ट व खाकी पॅन्ट असा ड्रेस होता. मी दुपारी एक वाजेपर्यंत डयुटी केली व पोलीस स्टेशनला गेलो. त्यानंतर ४.०० वाजता मी पोलीस कॉन्स्टेबल फर्नांडीस यांचेबरोबर पुन्हा भरडनाका येथे नाकाबंदीसाठी गेलो. आम्ही सायंकाळी सहा वाजेपर्यंत नाकाबंदी डयुटी केली. सायंकाळी ६.०० वाजता आम्ही बाजारपेठ पेट्रोलिंगसाठी रवाना झालो. पेट्रोलिंगला जात असताना पोलीस कॉन्स्टेबल कदम

आम्हांला भेटले. आम्ही त्यांना आमचेसोबत घेतले. त्यानंतर आम्ही बाजारपेठचे दिशेने मोटरसायकलने निघालो. माझेकडे एमएच.०७/जी/००२० या नंबरची मोटरसायकल होती. गांवकर नाका येथे रस्ता खोदण्याचे काम सुरू होते व त्या ठिकाणी कोणतेही वाहन जात नसल्याने आम्ही पुन्हा भरडनाक्याकडे निघालो. आम्ही सुमारे ६.१० वाजता झांटये हॉस्पीटल येथे पोचलो. त्यावेळी मला समोरून तीन लोक मोटरसायकलवरून येताना दिसले. म्हणून मी त्यांना थांबणेचा इशारा केला. त्या मोटरसायकलला नंबर प्लेट नव्हती, ती बजाज पल्सर मोटरसायकल होती. ती मोटरसायकल गिरीश पेडणेकर चालवत होता व त्याचे पाठीमागे राजेश पारकर आणि साईल पारकर बसलेले होते. मी त्यांचेकडे गाडी चालविणेचे लायसन्स व कागदपत्रं पडताळणीसाठी मागितले. त्यांनी गाडीचे कागदपत्र आणि ड्रायव्हींग लायसन्स दाखविले नाही व माझेशी हुज्जत घालू लागले. त्यांनी गाडीचे कागदपत्र दाखविणार नाही तसेच दंडही भरणार नाही, तुम्ही काय ते करून घ्या असे म्हणून मला शिवीगाळी केली. आरोपी राजेश पारकर मिठी मारून मला धरून राहिला. आरोपी साईल पारकर याने माझा डावा हात पिरगळला, त्यामुळे माझे डाव्या खांदयाला दुखापत झाली. साईल पारकर याने माझे कानावर आणि पोटावर ठोसे मारले. त्यावेळी रणजित पारकर आणि रमेश पारकर तेथे धावत आले. त्यांनी सुध्द्रा माझेशी हुज्जत घालून मला शिवीगाळी केली. त्यांनी माझेशी धक्काबुक्की करून मला भिलवडकर यांचे घरासमोरील गल्लीत रेटत नेले. पोलीस हेड कॉन्स्टेबल कदम मला सोडविणेस आले परंतु, त्यांना देखील त्यांनी धक्काबुक्की व शिवीगाळ केली. त्याठिकाणी लोक जमले. ती गल्ली अरूंद होती. त्या गल्लीमध्ये आरोपींनी माझे तोंड आणि गळा दाबून धरले. ते या पोलिसांला जिवंत ठेवणार नाही असे म्हणत होते. त्यांनी मला भिलवडकर यांच्या घराचे मागे असलेल्या गडग्याच्या आंत रेटत नेले. रमेश पारकर याने माझे दोन्ही पाय धरले. रणजित पारकर याने माझा गळा आणि तोंड दाबून धरले. त्यानंतर काही वेळाने पोलीस नाईक परूळेकर, पोलीस कॉन्स्टेबल राणे आणि सारंग तेथे आले. त्यानंतर आरोपी तेथून पळून गेले. त्यानंतर मी मुख्य रस्त्यावर आलो. त्याठिकाणी पोलीस स्टेशनचे इनचार्ज पीआय बुलबुले मला भेटले. मी त्यांना घ
टना सांगितली.

३. धक्काबुक्कीमुळे व घटनेमुळे माझा शर्ट मळला होता, तसेच दोन बटने तुटली होती तसेच माझी शिट्टी आणि शिट्टीची क्लीप तुटली होती. सदर घटनेमुळे मला माझे कर्तव्य पार पाडता आले नाही. त्यानंतर मी पोलीस स्टेशनला गेलो. घटनेची नोंद स्टेशन डायरीमध्ये घेतली व मला वैदयकीय तपासणीसाठी पाठविले. पोलीस कॉन्स्टेबल परब हे मला वैदयकीय तपासणीसाठी आणि उपचारासाठी घेवून गेले. मला ग्रामीण रूग्णालय, मालवण येथे नेले व माझी सायंकळी ७.३० वाजता तपासणी करून माझेवर उपचार करणेत आले. त्यानंतर मी मालवण पोलीस स्टेशनला गेलो व घटनेची फिर्याद दिली. आता मला सदरची फिर्याद दाखविली ती तीच आहे, त्यावर माझी सही आहे, त्यामधील मजकूर खरा व बरोबर आहे, त्यास **नि.क्र.४४** देणेत येते.

४. माझेवर ज्यांनी हल्ला केल्या त्या आरोपींना मी ओळखू शकतो. आरोपी कोर्टासमोर हजर आहेत.

५. फिर्याद नोंदविल्यानंतर मी माझा शर्ट दिला व तो पोलिसांनी जप्त केला. दुस—या दिवशी अेपीआय केराम यांनी मला घटनास्थळावर घटनास्थळ दाखविणेसाठी बोलाविले. मी घटनास्थळ त्यांना दाखविले. घटनास्थळावर शेडजवळ माझी शिट्टी व त्याची क्लीप मिळून आली. माझे शर्टची काळया रंगाची दोन बटने गल्लीमध्ये पडलेली मिळून आली. त्याप्रमाणे घटनास्थळाचा पंचनामा केला. मी बटने, शर्ट, शिट्टी, शिट्टीची क्लीप दाखविल्यास ओळखू शकतो.

६. आता मला मुद्देमाल **शर्ट अर्टिकल—१** दाखविला, तो माझाच शर्ट आहे, त्यावर माझे नावाची प्लेट आहे. सदरचा शर्ट मी घटनेच्या वेळी घातलेला होता. आता मला **मुद्देमाल शर्टची २ बटने दाखविली ती तीच आहेत, त्यास अर्टिकल—२** देण्यात आले. सदरची बटने ही माझ्याच अर्टिकल—१ या शर्टाची बटने आहेत. आता मला **मुद्देमाल शिट्टी दाखविली, ती तीच आहे. त्यास अर्टिकल—३ देणेत आले**. आता मला **मुद्देमाल क्लीप दाखविली ती**

**तीच आहे, त्यास अर्टिकल—४ देण्यात आले.** आरोपी ज्या मोटारसायकलने जात होते ती मोटारसायकल मला दाखविल्यास मी ओळखू शकतो.

७. आज रोजी मी सिंधुदुर्ग जिल्हा पोलीस म्हणून कार्यरत असलेबाबत माझे ओळखपत्र सोबत आणले आहे.

**<u>उलटतपास आरोपींतर्फे वकील श्री.एस.डी.देसाई यांचा</u>**

नि.क्र.४५ चे अर्जावरील आदेशान्वये उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब.

साक्षीदार यास जबानी समक्ष वाचून दाखविली,
बरोबर असल्याचे मान्य व कबुल केले.

स्वाक्षरी/—
दिनांक—१०/१२/२०२१ (आर.बी.रोटे)
अतिरिक्त सत्र न्यायाधीश,
सिंधुदुर्ग—ओरोस.